जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2025
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने सोमवार, दि. १७ रोजी तुकाराम बीजनिमित्त 'तुकोबांचे चौदा टाळकरी' या विषयावर डॉ. श्रीरंग गायकवाड यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. हे व्याख्यान शाहू स्मारक भवन, मिनी सभागृह, दसरा चौक येथे सायंकाळी ५ वाजता होणार आहे. व्याख्यानाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन मराठी विभागप्रमुख व संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

16 MAR 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महिला उद्योजकांनी उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा : अंदूरकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महिला या मुळातच उत्तम व्यवस्थापक असतात. महिला उद्योजकांना अनेकविध संधी उपलब्ध आहेत. त्यांचा लाभ त्यांनी तत्परतेने घ्यावा, असे आवाहन ग्लॅडियन्स ऑटोमेशन कंपनीच्या संचालक वैष्णवी अंदूरकर यांनी केले.



**कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना उद्योजक वैष्णवी अंदूरकर, आदी.**

शिवाजी विद्यापीठातील इनोव्हेशन, इनक्युबेशन आणि लिंकेजेस केंद्र, एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन आणि एमबीए युनिट, वाणिज्य व व्यवस्थापन विभागाच्या वतीने 'विकसित भारतातील महिला उद्योजकांची भूमिका' या विषयावर पीएम-उषा अंतर्गत नुकतीच एकदिवसीय कार्यशाळा झाली.

अंदूरकर यांनी महिला उद्योजकांनी बाजारपेठेतील स्पर्धा आणि इतर बाबींची संधी घेतली पाहिजे, असे धोरणात्मक मार्गदर्शन केले.

यावेळी पूजा इंडस्ट्रिज समूहाच्या काव्यश्री नलवडे आदींनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या विविध सत्रांत वैजयंती एस. काळे, मोनिका शेवाळे, वृषाली खोत यांनी स्वानुभव कथन केले. डॉ. प्रकाश राऊत यांनी स्वागत केले. डॉ. दीपा इंगवले यांनी आभार मानले. कार्यशाळेत डॉ. केदार मारुलकर, तेजश्री घोडके, अर्चना मानकर, डॉ. तेजपाल मोहरेकर, परशराम देवळी आदींनी सहभाग घेतला.

16 MAR 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या अंदाजपत्रकातून संशोधनास चालना

## विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवत नवीन शैक्षणिक धोरणास बळ ▶ ६०५ कोटी ७१ लाख रुपयांचे बजेट सादर

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाचे २०२५-२६ चे एकूण ६०५ कोटी ७१ लाख रुपयांचे अंदाजपत्रक अधिसभा सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी मांडले. अंदाजपत्रकावरील अर्ध्या तासाच्या चर्चेनंतर हे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या अधिसभेत अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे तेरावे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर सचिव म्हणून कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी काम पाहिले. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये ६०० कोटी १० लाख रुपये जमा होणे अपेक्षित आहे, तर अपेक्षित खर्च हा ६०५ कोटी ७० लाख आहे. अंदाजपत्रकामध्ये ५ कोटी ६० लाख रुपयांची तूट असून, ती विद्यापीठ फंडातून भरून काढली जाणार आहे. अंदाजपत्रकामध्ये तरतुदी करताना विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून संशोधनाला चालना देण्यात आली आहे, तर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला बळ देण्यासाठी विविध तरतुदी केल्या आहेत.

या अंदाजपत्रकाबाबत सदस्य संजय परमणे, प्रकाश कुंभार, श्रीनिवास गायकवाड, श्वेता परुळेकर, वर्षा जाधव, मंजिरी मोरे-देसाई यांनी विविध मुद्दे मांडले. याबाबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि डॉ. ढमकले यांनी स्पष्टीकरण दिले.



### असे प्रकार पून्हा घडू नयेत

अॅड. अभिषेक मिठारी म्हणाले, दोन महिन्यांपूर्वी राष्ट्रीय स्पर्धेसाठी जाणाऱ्या फुटबॉल संघातील काही खेळाडू अर्ध्या रस्त्यातून परतले. त्यामुळे विद्यापीठाची मोठी नामुष्की झाली. असे प्रकार पून्हा घडू नयेत म्हणून उपाययोजना कराव्यात.

**इतर तरतुदी :** ▶ विविध उपकरणे खरेदीसाठी ५.४७ कोटी. ▶ विद्यापीठ परिसरातील रस्त्यांसाठी १. ५० कोटी (घसारा निधीतून). ▶ २०२४ -२४ मध्ये ५०० किलोवॅट सौर यंत्रणा कार्यान्वित केली असून, दरमहा ५ लाखांची वीज बिलामध्ये बचत झालेली आहे. येत्या वर्षासाठी १ कोटीची आर्थिक तरतूद. ▶ यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट इमारतीसाठी महाराष्ट्र शासनाकडून १० कोटी. ▶ क्रीडा वसतिगृहाकरिता ३ कोटी.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुसरून तरतुदी

▶ दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्रांतर्गत डिजिटल आणि ऑनलाईन शिक्षण : १ कोटी ४ लाख ▶ दिव्यांगांसाठी तरतूद : २ कोटी ५० लाख ▶ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी : २ कोटी १६ लाख

### अंदाजपत्रकातील महत्त्वाच्या तरतुदी

▶ मेरिट स्कॉलरशिप : ६० लाख ▶ परदेशी विद्यार्थ्यांच्या सोयी-सुविधा : ६७ लाख १५ हजार ▶ विद्यार्थिनी वसतिगृह : ३ कोटी ८ लाख ▶ विद्यार्थी वसतिगृह : २ कोटी १ लाख ▶ कमवा व शिका मुलींचे वसतिगृह सोयी-सुविधा व दैनंदिन खर्च : १७ लाख ९७ हजार ▶ रिसर्च स्कॉलर होस्टेल : २० लाख ▶ यूथ होस्टेलची नवीन इमारत : ३ कोटी ▶ स्टुडंट फॅसिलिटी : १ कोटी ४७ लाख

### संशोधनाला चालना देण्यासाठीच्या तरतुदी

▶ शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी ग्रंथालय विभाग : ३ कोटी २ लाख
▶ संशोधनाला चालना देण्याकरिता रिसर्च स्किम : २ कोटी २५ लाख
▶ संगणक प्रणाली विकसित करणे : २ कोटी ६३ लाख
▶ पीएम उषा अंतर्गत सर्वांगीण विद्यार्थी विकास : ७ कोटी ४७ लाख
▶ पीएम उषा अंतर्गत उपकरणे खरेदी : ५ कोटी ७७ लाख

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2025

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात मंगळवारी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन, सांगली येथील मुस्कान व कोल्हापूर येथील अभिमान संस्थेतर्फे मंगळवारी (दि. १८) तृतीयपंथीयांच्या प्रश्नांवर कार्यशाळा आयोजित केली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या मीना शेषू, विशाल पिंजानी, संध्या पाटील व सना शेख तृतीयपंथीयांच्या प्रश्नावर मार्गदर्शन करणार आहेत. मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी १०:३० वाजता कार्यशाळा सुरू होईल. यास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व अध्यासनाच्या समन्वयक डॉ. प्रा. भारती पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात मूट कोर्ट स्पर्धा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

युवा वकिलांनी आयुष्यात यशस्वी वकील व्हायचे असल्यास कायद्याच्या ज्ञानाबरोबरच सभोवतालच्या घडामोडीकडे लक्ष ठेवून चौफेर ज्ञान बाळगणे गरजेचे आहे. सध्याच्या काळात अशा उपक्रमाची गरज आहे, असे प्रतिपादन निवृत्त न्या. पी. आर. बोरकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ विधी विभागाच्या वतीने मूट कोर्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी डॉ. विवेक धुपदाळे, ज्येष्ठ विधीज्ञ गिरीश नाईक, ॲड. सूर्यकांत मिरजे, ॲड. संदीप मुतालिक, ॲड. प्रमोद दाभाडे, ॲड. अरविंद पाटील ॲड. नंदकिशोर भगवान, ॲड. अभिजित शितोळे आदी उपस्थित होते. न्या. बोरकर म्हणाले, केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून कोर्टात युक्तिवाद कसा करावा, याचा प्रत्यक्ष अनुभव मूट कोर्टद्वारे विद्यार्थ्यांना मिळतो. यामुळे सक्षम विद्यार्थी तयार होण्यास मोलाची मदत मिळते.

विद्यापीठ विधी अधिविभाग




प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे म्हणाले, कायद्याचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर कोर्टात कसा युक्तिवाद करावा, याचा प्रत्यक्ष अनुभव मिळणे महत्त्वाचे असते. राष्ट्रीय स्तरावरील मूट कोर्ट व वाद विवाद निवारण स्पर्धेत शिवाजी विद्यापीठासह अनेक महाविद्यालयांनी सहभाग घेतला.

एलएल.बी. मूट कोर्टचे विजेतेपद एम.पी. लॉ कॉलेज औरंगाबाद यांनी पटकावले. विक्टर डेंटस लॉ कॉलेज कुडाळ उपविजेतेपद मिळाले. कार्यक्रमाचे संयोजन आर. नारायण यांनी केले. यावेळी ॲड. प्रमोद दाभाडे, अक्षय कोल्हापुरे, प्रतीक्षा राजहंस, सुवर्णा कांबळे, शिवानी रामदासी, शुभांगी क्षीरसागर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2025
पुढारी

# अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ तृतीय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पंजाबमधील चित्कारा विद्यापीठात झालेल्या आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागाने तृतीय क्रमांक पटकावला. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धा चित्कारा विद्यापीठ, पंजाब येथे झाली. स्पर्धेमधील ३ संशोधन शाखांसाठी शिवाजी विद्यापीठामार्फत आठ जणाचा संघ सहभागी झाला.

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या शाखेतून शुभम गिरीगोसावी, बालाजी पाटील व रोहित गवळी या विद्यार्थ्यांच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. समन्वयक म्हणून डॉ पी. के. पवार, सुशांत पंगम व डॉ. शुभांगी कांबळे होते. संशोधन स्पर्धेसाठी विद्यापीठ संघास कुलगुरु प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. टी. एम. चौगले, डॉ. डी. एच. दगडे यांचे मार्गदर्शन लाभले.

16 MAR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधन, विद्यार्थी सुविधांवरील निधीचा टक्का वाढला

## विद्यापीठाचे ६०५ कोटींचे 'अंदाजपत्रक' मंजूर; राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून नव्या तरतुदी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठाचे तेरावे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या कारकिर्दीतील अखेरचे अंदाजपत्रक (अंदाजपत्रक सन२०२५-२६) आज सिनेटने मंजूर केले. तब्बल ६०५ कोटी ७१ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकामध्ये यंदा विद्यापीठाने संशोधन, विद्यार्थी सुविधांवरील निधीचे प्रमाण सरासरी दहा टक्क्यांनी वाढविले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून काही नव्या तरतुदी केल्या आहेत.

सिनेट सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी अंदाजपत्रक मांडले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. या अंदाजपत्रकावर सिनेट सदस्यांनी विविध सूचना, मते मांडली. त्यावर कुलगुरू डॉ. शिर्के, डॉ. ढमकले यांनी स्पष्टीकरण दिले. अर्धा तासाच्या चर्चेनंतर सभागृहाने 'अंदाजपत्रक' मंजूर केले. अंदाजपत्रकामध्ये अपेक्षित जमा ६०० कोटी १० लाख, तर अपेक्षित खर्च ६०५ कोटी ७१ लाख रुपये आहे. वित्तीय तूट ५ कोटी ६० लाख रुपये असून, ती विद्यापीठ निधीतील शिल्लकेतून भरून काढली जाणार आहे. विद्यार्थी सुविधा, संशोधनासाठी ३७ कोटी ३१ लाख, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासाठी २ कोटी १६ लाख आणि इमारतींच्या बांधकामासाठी १४ कोटी २२ लाखांची तरतूद केली आहे.


संशोधनाला टक्का कमी,
रस्ते- इमारतींवर अधिक

'अंदाजपत्रका'मध्ये संशोधनावरील निधीचा टक्का कमी होत असल्याच्या मुद्याकडे 'सकाळ' ने वृत्तमालिकेतून लक्ष वेधले होते.

| अपेक्षित जमा-खर्च (कोटींमध्ये) | | |
|---|---|---|
| विभाग | जमा | खर्च |
| प्रशासकीय | ४६.१८ | ५५.७२ |
| शास्त्र | ५.३२ | ७.४४ |
| इतर विभाग | ३.४२ | ७.१७ |
| इतर उपक्रम | ३५.३१ | ५२.९९ |
| वेतन अनुदान | १५२.५० | १५७.४८ |
| वेगवेगळ्या संस्था | २५.५१ | १३.१५ |
| संशोधन व विकास निधी | ४२.२३ | ४२.२३ |
| घसारा निधी | १६.५१ | १६.५१ |
| निलंबन लेखे | २७३.१२ | २५३.०१ |
| एकूण | ६००.१० | ६०५.७० |

### 'सकाळ'मुळे बदलली 'अंदाजपत्रका'ची मांडणी

■ गेल्या तीन वर्षांतील विद्यापीठाच्या 'अंदाजपत्रका'मधील वाढती वित्तीय तूट, संशोधन आणि विद्यार्थी सुविधांवरील कमी तरतूद, बांधकामावरील वाढलेला खर्च या बाबींकडे 'सकाळ'ने वृत्तमालिकेतून लक्ष वेधले होते. त्याचा विचार करून प्रशासनाने 'अंदाजपत्रका'च्या सादरीकरणाचे स्वरूप यंदा बदलले. संशोधनावरील निधीचा टक्का वाढविला. विद्यार्थीकेंद्रित, संशोधनाला चालना, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत या तीन विभागांत सविस्तरपणे तरतुदींची मांडणी केली. 'सकाळ'चा दाखला देत, वास्तव मांडल्याचा उल्लेख करत काही अधिसभा सदस्यांनी 'अंदाजपत्रका'बाबत सूचना केल्या. त्यात श्वेता परुळेकर, डी. एन. पाटील आदींचा समावेश होता.

### काही नव्या तरतुदी

- युवा महोत्सव, आविष्कार स्पर्धा ........................ १ कोटी ४७ लाख
- रिसर्च प्रमोशन स्कीम ........................ १० लाख
- डिजिटल, ऑनलाईन शिक्षण ........................ १ कोटी ४ लाख
- संशोधनाला लागणाऱ्या उपकरणांची खरेदी ........ ५ कोटी ७७ लाख
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी .. २ कोटी १६ लाख
- लोकस्मृती वसतिगृह ........................ १ कोटी ४ लाख

### 'अंदाजपत्रका'वर सदस्य म्हणाले ...

■ प्रकाश कुंभार : खोतर महाविद्यालयांमधूनच विद्यार्थ्यांच्या शुल्कातून विद्यापीठात मोठ्या प्रमाणात महसूल जमा होतो. पण, तरतुदी पाहता महाविद्यालयाच्या पातळीवर विद्यापीठाचे अंदाजपत्रक हे सुसंगत नाही.

■ व्ही. एम. पाटील : विद्यापीठाचे अंदाजपत्रक विद्यार्थीकेंद्रित आणि संशोधनाला चालना देणारे आहे.

■ संजय परमणे : एकूण बजेटमध्ये विद्यार्थ्यांसाठी केवळ १३ कोटी रुपयांची तरतूद दिसते. हवामान बदलाच्या अभ्यासासाठीची तरतूद वाढवावी.

■ श्वेता परुळेकर : विद्यापीठातील रस्ते, इतर भौतिक सुविधांच्या कामांसाठी आमदार, सीएसआर फंडातून निधी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न वाढवावेत.

■ वर्षा जाधव : मुलींच्या हॉस्टेलसाठी भरीव तरतूद केली आहे. हे अंदाजपत्रक विद्यार्थिनीकेंद्रित आहे.

■ मंजिरी मोरे : महाविद्यालयांमध्ये नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तरतूद करावी. सिनेट हॉलप्रमाणेच आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारावे.

16 MAR 2025

पुण्यनगरी


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील तलाव आंतरराष्ट्रीय विज्ञानपत्रिकेच्या मुखपृष्ठावर

## रासायनिक संयुगाच्या संरचनेच्या प्रतिबिंबाचा आभास; डॉ. सुशीलकुमार जाधव यांच्या निरीक्षणाचे फलित

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संशोधनाच्या विचारात गुंतलेल्या संशोधकांनाही 'जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी' अशी सर्वत्रच आपल्या संशोधनाची प्रतिबिंबे दिसू लागतात. शिवाजी विद्यापीठातील शिक्षक, संशोधक डॉ. सुशीलकुमार जाधव यांच्या बाबतीतही असेच घडले. एरवी विद्यार्थ्यांमध्ये सनसेट पॉईंट म्हणून प्रसिद्ध असलेल्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाशेजारील तलावामधील झाडाच्या प्रतिबिंबामध्ये त्यांना एका रासायनिक संयुगाच्या संरचनेचा आभास झाला. ते छायाचित्र त्याच ठिकाणाहून त्यांनी टिपले




कोल्हापूर : नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या स्प्रिंजर नेचर प्रकाशनाच्या 'मॅक्रोमॉलेक्युलर रिसर्च' या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेच्या मुखपृष्ठावर झळकलेले छायाचित्र.

व नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या स्प्रिंजर नेचर प्रकाशनाच्या 'मॅक्रोमॉलेक्युलर रिसर्च' (मार्च २०२५) या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेच्या मुखपृष्ठावर झळकण्याचा मान या छायाचित्राला लाभला.

या संदर्भात शिवाजी विद्यापीठातील नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागातील प्राध्यापक डॉ. सुशीलकुमार जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या मार्गदर्शनाखाली शंभूराज कापसे व प्रणोती पाटील हे विद्यार्थी संशोधन करत आहेत. त्यांच्याच शोधनिबंधाच्या विषयास अनुसरून हे मुखपृष्ठ तयार केलेले आहे. 'मॅक्रोमॉलेक्युलर रिसर्च' या आंतरराष्ट्रीय मानांकित जर्नलच्या प्रत्येक अंकात पंधरा ते वीस शोधनिबंध प्रसिद्ध होतात. या सर्वांत स्पर्धा घेऊन एका शोधनिबंधाशी संबंधित छायाचित्र मुखपृष्ठासाठी निवडले जाते. त्यातून शिवाजी विद्यापीठ परिसरातील संगीत तलावाचे डॉ. जाधव यांनी काढलेल्या छायाचित्राची निवड या महिन्याच्या मुखपृष्ठासाठी झाली.

डॉ. जाधव, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAR 2025
लोकमत

# जैन बोर्डिंग येथे आज राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर : प्रथमाचार्य शांतीसागर आचार्य शताब्दी आणि राष्ट्रसंत विद्यानंद महाराज जन्मशताब्दीनिमित्त शिवाजी विद्यापीठाचे भगवान महावीर अध्यासन आणि दिगंबर जैन बोर्डिंग यांच्यावतीने आज, रविवारी जैन गणिव ज्योतिषशास्त्र राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. जैन बोर्डिंगमध्ये आयोजित या परिषदेचे उद्घाटन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते होईल. इंदोरच्या राणी अहिल्याबाई विश्वविद्यालयाच्या माजी कुलगुरू डॉ. रेणू जैन, राष्ट्रीय गणिततज्ज्ञ डॉ. अनुपम जैन हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. या परिषदेसाठी उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. व्ही. व्ही. ककडे, सुरेश रोटे यांनी केले.

16 MAR 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनाला चालना, नवीन धोरणाला बळ

## शिवाजी विद्यापीठाचे ६०० कोटींचे अंदाजपत्रक : अधिसभा बैठकीत एकमताने मंजुरी, ५ कोटी ६० लाखांची तूट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यार्थी केंद्रित, संशोधनाला चालना देणारे व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत असे शिवाजी विद्यापीठाचे सन २०२५-२०२६ चे ६०० कोटी रुपयांचे वार्षिक अंदाजपत्रक शनिवारी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी अधिसभेच्या बैठकीत मांडले. त्याला एकमताने मंजुरी देण्यात आली. या अंदाजपत्रकात ५ कोटी ६० लाख इतकी तूट असून, विद्यापीठ निधीतील शिल्लकेतून ती भरून काढण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या अधिसभेची बैठक शाहू सिनेट सभागृहात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी प्र कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीलाच डॉ. शिर्के यांनी वार्षिक अहवाल सादर केला. या अंदाजपत्रकात २०२५-२६ मध्ये ६०० कोटी १० लाख रुपये इतकी अपेक्षित रक्कम जमा होणार असून, ६०५ कोटी ७१ लाख रुपये खर्च होणार आहेत. संशोधनाला चालना देणारे तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत अंदाजपत्रक असून, शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी पुस्तके व जर्नल खरेदीसाठी ग्रंथालय विभागास ३ कोटी २ लाख,

संशोधन योजनेसाठी २ कोटी २५ लाख, संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी २ कोटी ६३ लाख इतकी तरतूद केली. यावेळी विद्यार्थी विकास मंडळाचा अहवाल, क्रीडा अधिविभागाचा अहवाल व तक्रार निवारण कक्षाच्या अहवालाला मंजुरी देण्यात आली.



### कोणत्या विभागाकडून किती रक्कम जमा होणार

| | |
|---|---|
| इतर उपक्रम : | ३५.३१ कोटी |
| शास्त्र अधिविभाग : | ५.३२ कोटी |
| इतर अधिविभाग : | ३.४२ कोटी |
| प्रशासकीय विभाग : | ४६.१८ कोटी |

**९०.२३ कोटी** एकूण विद्यापीठाच्या स्वनिधीत जमा अपेक्षित आहे.

### कोणत्या विभागावर किती खर्च होणार

| | |
|---|---|
| निलंबन लेखे | २५३ कोटी ०१ लाख |
| वेतन अनुदान खर्च | १५७ कोटी ४८ लाख |
| प्रशासकीय विभाग | ५५ कोटी ७२ लाख |
| विविध सेवा व इतर उपक्रम | ५२ कोटी ११ लाख |
| संशोधन व विकास निधी | ४२ कोटी २३ लाख |
| घसारा निधी | १६ कोटी ५१ लाख |
| वित्तीय संस्थांकडून मिळणाऱ्या निधीमधून खर्च | १३ कोटी १५ लाख |
| शास्त्र अधिविभाग | ७ कोटी ४४ लाख |
| इतर अधिविभाग | ७ कोटी १७ लाख |

### कशासाठी केली तरतूद

**६७.१५** लाख रु. परदेशी विद्यार्थ्यांच्या सुविधा

**६०** लाख रु. मेरिट स्कॉलरशिप

**३७** लाख रु. खेळाची मैदाने सुस्थिती

**५.६०** कोटीची तूट

**२०** लाख रु. रिसर्च स्कॉलर होस्टेल

**२५** लाख रु. खेळाचे साहित्य खरेदी

### मिळणार १५२ कोटी, खर्च होणार १५७ कोटी

**१** वेतन अनुदानापोटी शासनाकडून १५२ कोटी ५० लाख रुपये मिळणार आहेत तर वेतन अनुदानाचा खर्च १५७ कोटी रुपये आहे.

**२** वेगवेगळ्या संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी २५ कोटी ५१ लाख रुपये जमा अपेक्षित आहे.

**३** विद्यापीठाच्या संशोधन व विकास निधीतून ४२ कोटी २३ लाख इतकी रक्कम व घसारा निधीच्या शिल्लक रकमेतून १६ कोटी ५१ लाख इतकी रक्कम जमेकरिता प्रस्तावित आहे.

**४** निलंबन लेख्यांमधून २७३ कोटी १२ लाख असे एकूण ६०० कोटी १० लाख जमा होणे अपेक्षित आहे.



विद्यार्थिनी वसतिगृह : ३ कोटी ८ लाख
विद्यार्थी वसतिगृह : २ कोटी १ लाख

16 MAR 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ कॅम्पसमधून आंतरराष्ट्रीय क्रीडापटू घडावेत

## कुलगुरू डॉ. शिर्के; 'शिवस्पंदन'मध्ये तंत्रज्ञान अधिविभागास सर्वसाधारण विजेतेपद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कॅम्पसमधून उत्तमोत्तम, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे क्रीडापटू घडावेत, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात गेल्या आठवड्यात पार पडलेल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या सर्वसाधारण विजेत्यांची घोषणा व पुरस्कार प्रदान सोहळा क्रीडा अधिविभागाच्या सभागृहात झाला. यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. तंत्रज्ञान अधिविभागाने स्पर्धेमध्ये सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने गतवर्षीपासून कॅम्पसवरील विद्यार्थ्यांच्या कला, क्रीडा गुणांना संधी प्रदान करण्याचे ठरवून 'शिवस्पंदन' वार्षिक महोत्सवाला प्रारंभ केला. याला विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद लाभत आहे. केवळ स्पर्धेपुरते मर्यादित न राहता क्रीडापटूंनी शैक्षणिक प्रगतीबरोबरच क्रीडा कौशल्यांच्या विकासाकडेही लक्ष द्यावे.




कोल्हापूर : शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना तंत्रज्ञान अधिविभागाचा संघ. (छाया : नाज ट्रेनर)

क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. किरण पाटील यांनी आभार मानले.

यावेळी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार आदींसह कर्मचारी उपस्थित होते. क्रीडा स्पर्धा यशस्वीतेसाठी डॉ. राजेंद्र रायकर, प्रा. किरण पाटील, डॉ. राम पवार, डॉ. धनंजय पाटील, डॉ. नीलेश पाटील, प्रा. एन. आर. कांबळे यांनी परिश्रम घेतले.

**तंत्रज्ञान अधिविभाग विजेता**

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यामध्ये तंत्रज्ञान अधिविभागाच्या संघाने स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. त्यांना विजेतेपदाचा चषक प्रदान करण्यात आला. क्रीडा अधिविभागाच्या संघाने सर्वसाधारण द्वितीय तर गणित अधिविभागाने तृतीय क्रमांकाचे विजेतेपद पटकावले.